ग्रंथार्थ

गोविंद कदम • नांदेड

बालकांचे भावविश्व समृद्ध करणारा कथासंग्रह

आबा गोविंदा महाजन हे मराठी साहित्यात विशेषत: बालसाहित्यात सकल मराठी मुलुखातील सर्वपरिचित नाव. कल्पकता व आत्मपर कथनातून साकारलेला त्यांचा 'आबाची गोष्ट' हा १७ कथांचा समावेश असणारा संस्कारक्षम कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. कथेत अतिरंजकता आणून कथेची व्याप्ती वाढवण्यापेक्षा ओघवत्या भाषेत नेमका आशय सांगून हा कथासंग्रह लिहिण्यात आला आहे.

आबा गोविंदा महाजन हे मराठी साहित्यात विशेषत: बालसाहित्यात सकल मराठी मुलुखातील सर्वपरिचित नाव. त्यांचा 'आबाची गोष्ट' हा कथासंग्रह नुकताच वाचण्यात आला. कल्पकता व आत्मपर कथनातून साकारलेला १७कथांचा समावेश असणारा संस्कारक्षम कथासंग्रह. कथेत अतिरंजकता आणून कथेची व्याप्ती वाढवण्यापेक्षा ओघवत्या भाषेत नेमका आशय सांगून हा कथासंग्रह लिहिण्यात आला आहे. सर्वांना समजेल-उमजेल अशा साध्या-सोप्या-सरळ भाषेत लिहिलेली एक-एक गोष्ट आपल्या चंचल मनाला वेगवेगळ्या भावविश्वात घेऊन जाते. वाक्यरचना छोटी-छोटी असल्यामुळे लहान मुलांना वाचण्यास सोपी वाटते. प्रत्येक गोष्ट, त्या गोष्टीतील प्रसंगाची मांडणी, गोष्टीची भाषा अन् आशय वाचकाला आपला वाटतो, आपल्या भावविश्वाशी निगडित वाटतो. त्यामुळे 'आबाची गोष्ट' वाचताना नकळतपणे वाचक अनेक वेळा स्वत:च्या भावविश्वात, स्वत:च्या भूतकाळात 'आबाची गोष्ट' शोधण्याचा प्रयत्न करतो.

प्रत्येक गोष्ट कोणत्या ना कोणत्या नैतिक मूल्यांची ठेवण आपल्या मनात रुजवून पुढे जाते. काही गोष्टीत आपले प्रौढ मन नि:शब्द होते तर काही ठिकाणी आपले मन प्रौढपण विसरून बालमनात हुंदडायला लागते. काही गोष्टी विचार करावयास भाग पाडतात. त्यामुळे वाचताना आपलं मन कधी शेताच्या बांधावर जाऊन शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावरील दु:ख वाचण्याचा, वाचून ते वेचण्याचा प्रयत्न करते तर कधी आपलं मन शाळेच्या बाकावर जाऊन रमते आपल्या रम्य बालमनात. निवेदनात मराठी बोलीभाषा तर संवादात खान्देशी बोलीभाषेचा सुयोग्य वापर केल्यामुळे कथानक वाचताना गोडवा निर्माण होतो.

ह्या पुस्तकातील पहिलीच गोष्ट मनाला स्पर्श करून हृदयात जाऊन स्थिरावते. पहिल्या गोष्टीतील अर्जुन पाटील व त्यांची मुक्या प्राणिमात्रांवरील भूतदया अन् त्यापायी त्यांना गमवावा लागलेला स्वत:चा जीव, हे वाचून आतून खूप भारावून येतं. ह्या गोष्टीतून बाहेर पडून दुसरी गोष्ट वाचण्यास मिळते ती आबांच्या टोपणनावाची. पहिल्या गोष्टीत गहिवरून गेलेले

'इन्साफ' आणि 'इन्सानियत'च्या नावाखाली...

कलीम अजीम • पुणे

तिहेरी तलाक कायद्यातून मुस्लिम अनुनयाचा आरोप सामान्य लोकांमधून होत आहे. जे काँग्रेसने मतांच्या राजकारणासाठी केलं होतं तेच भाजपने मुस्लिमांच्या शत्रुकरणासाठी केलं आहे. दोन्ही पक्ष आता मुसलमानांच्या दृष्टीने सारखेच वाटू लागले आहेत.

बहुचर्चित 'मुस्लिम महिला (विवाह हक्क संरक्षक) विधेयक-२०१९' अखेर दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. एकतर्फी तलाक रद्दीकरणामुळे एक वादग्रस्त विषय अस्ताला गेला आहे. त्याबद्दल भाजप सरकार अभिनंदास पात्र आहे. शत्रुकरणातून का होईना भाजपने गेल्या ३३ वर्षांपासून छळत असलेले मुस्लिमविरोधाचे हत्यार स्वत:हून संपवले. त्यामुळे हे सरकार तिहेरी तलाक रद्दीकरणासाठी कौतुकास पात्र ठरले आहे.

संसदेच्या सल्लामसलतीने कायदा करावा, असा स्पष्ट उल्लेख असताना सरकारने संबंधित गटाला न विचारता, त्यांना विश्वासात न घेता हा कायदा आणला, असा विरोधकांचा सुरुवातीपासून आरोप आहे. त्यामुळे सत्ताधारी वगळता अन्य सर्व विरोधी गटांचा या विधेयकाला विरोध होता. तिहेरी तलाक हे सिव्हिल गुन्ह्याच्या कॅटेगरीत येते, त्याला सरकार फौजदारी गुन्हा का ठरवत आहे, असा युक्तिवाद बहुतेक अभ्यासकांनी केलेला आहे. गेल्या तीन वर्षांपासून तलाकवर खूप लिहिले व बोलले गेलेले आहे. तरीही कायदा करताना लग्न न मोडता संसार टिकावेत या दृष्टीने हा मुद्दा ध्यानात घेतला गेला नाही, त्यामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न अजूनही अनुत्तरित राहिलेले आहेत.

घटनात्मक पेच : आवश्यकतेची परिस्थिती नसताना केलेली शिक्षा ही जुलूमी असते, असं मॉटेस्क्यूचं प्रसिद्ध विधान आहे. सरकारच्या नव्या कायद्याच्या बाबतीच तेच झालं आहे. कोर्टाने एका बैठकीत दिला जाणारा तलाक घटनाबाह्य म्हणजे रद्द ठरवला आहे. म्हणजे तो घटस्फोट ग्राह्य मानला जाणार नाही. अर्थातच जो गुन्हा घडलाच नाही त्याची शिक्षा सरकार का देऊ करत आहे? जर तीनदा तलाक देऊन पती-पत्नी एकाच घरात राहत असतील तर तो गुन्हा कसला? जर त्याने विवाहविच्छेद केला तर पत्नी तक्रार दाखल करू शकते. पण नागरी गुन्ह्यासाठी फौजदारी शिक्षेची तरतूद का केली आहे?

जिथे एखाद्या व्यक्तीचे नुकसान होते, असे खासगी गैरव्यवहार किंवा व्यक्तिगत अधिकार यांच्याशी दिवाणी कायदा संबंधित असतो. त्यामुळे अशा प्रकरणात नुकसान भरपाई पुरेशी मानली जाते. याउलट, जिथे केवळ एखाद्या व्यक्तीलाच इजा पोहोचते असं नाही, तर एकंदरीत संपूर्ण मानव समाजाच्या हितालाच बाधा पोहोचते; अशा परिस्थितीशी फौजदारी कायदा संबंधित असतो. अर्थातच, इथे केवळ नुकसानभरपाई पुरेशी मानली जात नाही; तर त्या प्रकरणात शिक्षाही ठोठावली जाते. समाजाच्या वतीने शासन त्या आरोपीविरोधात फौजदारी खटला चालवते. (फैजान मुस्तफा). अशा परिस्थितीत पत्नीला तीनदा तलाक शब्द उच्चारणे हा गंभीर गुन्हा कसा काय ठरू शकतो? जिथे नागरी कायदे पुरसे आहेत तिथे फौजदारी कायद्याची गरज नाही. याउलट असे काही गंभीर गुन्हे आहेत, जिथे तीन वर्षांपेक्षा कमी शिक्षेची तरतूद आहे. त्यात दंगल घडविणे, प्राणघातक शस्त्र बाळगणे, समाजात वैरभावना पसरवणे, नकली नोटा तयार करून त्या चलनात आणणे, एखाद्या समूहाच्या धार्मिक श्रद्धांचा हेतुपुरस्सर आणि द्वेषभावनेने अपमान करणे इत्यादी. याउलट लाच घेतल्यास १ वर्षांचा कारावास, प्राणघातक रोगांचा प्रसार होण्यास कारणीभूत, अन्न व खाद्य वस्तूंमध्ये भेसळ, इतरांचे आयुष्य किंवा वैयक्तिक सुरक्षेस धोका निर्माण होईल असं कृत्य इत्यादी गुन्ह्यासाठी ६ महिन्यांची जेल किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद आहे.

प्रासंगिक

शस्त्राची मूठ : आपला समाज हा पुरुषप्रधान मानला जातो. या व्यवस्थेत स्त्री हिंदू किंवा मुस्लिम नसते तर ती केवळ एक अबला महिला असते. त्यामुळे पुरुष या कायद्यातून पळवाट काढेलच. शिक्षा भोगून आल्यावर तो पत्नीला नांदवेल अशी शक्यता फार कमी आहे. कारण सरकारने प्रस्तावित कायद्यात तडजोडीला खूप कमी जागा ठेवलेली आहे. कायदा हा लोकांच्या हितासाठी असतो. पण इथे हा कायदा विवाहच नाही तर संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करणारा ठरणार आहे.

कायदा केल्यावर एकतर्फी तलाकची प्रकरणं कमी होतील, यात कुठलंच दुमत असू शकत नाही. पण आवश्यकतेपेक्षा अधिक कठोर कायदा हा जुलूम ठरू शकतो, हेदेखील विसरता येणार नाही. पतीला तुरुंगात पाठवल्यावर त्या पत्नीला घरात ठेवून घेईल, खरंच इतकी प्रामाणिक व नीतिवान कुटुंब व्यवस्था आहे का हो आपली? तलाक न घेताही स्त्रिया पतीच्या घरातून बेदखल होऊ शकतात. अशा वेळी कुठला कायदा तिच्या वैवाहिक व कौटुंबिक अधिकारांच्या बाजूने उभा राहील? कुठल्या कायद्यातून तिला संरक्षण मिळू शकेल?

वास्तविक, या कायद्याने पुरुषांना महिलांचे जगणे व त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या शस्त्राची मूठ देऊ केली आहे. तलाक न देता मुस्लिम पुरुष पत्नीला वाऱ्यावर सोडू शकतो. त्याला कायदा अडसर ठरू शकत नाही. प्रस्तावित कायद्यामुळे भाजपचा हट्ट तेव्हा पूर्ण होणार पण मुस्लिम महिलांचे वैवाहिक प्रश्न सुटणार नाहीत, तर ते अधिक गुंतागुंतीचे होणार आहेत. या समस्येची सोडवणूक करण्याची कुठलीही तरतूद संबंधित कायद्यात नाही. कुठलेही कारण न देता पत्नीला सोडून दिलेल्या पुरुषांची संख्या समाजात मोठी आहे. नव्या कायद्यामुळे ही संख्या वाढू शकते. यात मुस्लिम आणि हिंदू असा भेदभाव करता येत नाही, प्रत्येक समूह गटात ही समस्या आहे. पण सरकारने फक्त मुस्लिम महिलांसाठी कायदा केलेला आहे, याचे कारण वेगळे सांगायची गरज नाही.

विधेयक सादर करताना दोन्ही सभागृहांत कायदा मंत्री रविशंकर प्रसाद म्हणाले, मुस्लिम महिलांच्या 'इन्साफ' आणि 'इन्सानियत'साठी आम्ही कायदा आणत आहोत. प्रत्येक वेळी कायदामंत्र्यांनी हीच भूमिका लावून धरली. पण त्याच वेळी ते भाजप पुरस्कृत संघटनांनी मॉब लिंचिंगमधून माजवलेला उच्छाद विसरले. गाय व भगवान रामाच्या नावाने सुरू असलेल्या गुंडगिरीमुळे केवळ मुस्लिमच नाही तर हिंदू महिलादेखील विधवा झालेल्या आहेत. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत. शेकडो मुलांनी आपला बाप गमावला. अनेक वृद्ध माता-पित्यांनी कमविता मुलगा गमावला, या अमानवी कृत्यावर सरकारने कधीही मगरीचे अश्रूसुद्धा ढाळले नाहीत. तिथे 'न्याय' आणि 'मानवता' लागू होत नाही का?

तिहेरी तलाकचा प्रश्न राष्ट्रीय स्वरूपाचा करून हिंदूंची व्होट बँक मजबूत करण्यापलीकडे भाजपने दुसरे काहीच केलेले नाही. याचिकाकर्त्या सायराबानो व इशरत जहाँला भाजपमध्ये दाखल करून घेऊन या कारस्थानामागील आपला छुपा चेहरा भाजपने उघडकीस आणला आहे. पहिले तलाकविरोधी विधेयक राज्यसभेत सादर होताच 'निकाह ए हलाला' रद्द करण्याची मागणी सुप्रीम कोर्टाला केली गेली. अर्थातच ही याचिका भाजपकडून दाखल करण्यात आली होती. मार्च २०१८ला भाजप नेते अश्विनी उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केलेली आहे. उपाध्याय यांच्यानंतर काही मुस्लिम महिलांच्या नावे अशीच याचिका कोर्टात दाखल झालेली आहे. यापूर्वी २०१५ला उपाध्याय यांनीच समान नागरी कायदा लागू करावा म्हणून सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती; जी कोर्टाने फेटाळली.

हिंदू महासभेच्या केरळ शाखेने मशिदीमध्ये महिलांना प्रवेश मिळावा म्हणून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जी नुकतीच ८ जुलैला 'चीप पब्लिसिटी स्टंट' म्हणत कोर्टाने धुडकावून लावली. मुळात कायदा सर्वांसाठी एकसारखा असावा. त्यात हिंदू-मुस्लिम असा भेदभाव होता कामा नये, असं करणेही घटनाबाह्य आहे. तिहेरी तलाकमुळे भारतीय मुस्लिम व इस्लामचं विकृतीकरण करण्याची प्रक्रिया पार पाडली गेली. हे प्रकरण इथपर्यंत न राहता दोन समाजात वितुष्ट निर्माण करण्यापर्यंत गेलं आहे. परिणामी हिंदू-मुस्लिम असा भेद ठळकपणे समोर येत आहे. मुस्लिम असल्याने सार्वजनिक सेवा नाकारण्याची द्वेषबुद्धी समाजात फोफावत आहे. कायदा फक्त मुस्लिम महिलांसाठीच का, असा प्रश्नदेखील समाजातून येत आहे. त्यामुळे हा कायदा मुस्लिमांचे सार्वजनिक आयुष्य डिस्टर्ब करण्यासदेखील कारणीभूत ठरू शकतो.

तिहेरी तलाक कायद्यातून मुस्लिम अनुनयाचा आरोप सामान्य लोकांमधून होत आहे. जे काँग्रेसने मतांच्या राजकारणासाठी केलं होतं तेच भाजपने मुस्लिमांच्या शत्रुकरणासाठी केलं आहे. दोन्ही पक्ष आता मुसलमानांच्या दृष्टीने सारखेच वाटू लागले आहेत. प्रस्तावित कायद्याचा हेतू कुठलाही असो पण त्याची गरज होती. परंतु कायद्याचे गुन्हेगारीकरण करून भाजपने आपला मुस्लिमविरोधाचा अजेंडा राबविला आहे. कायदा करताना सरकारने मुस्लिम समुदायाशी किमान पातळीवर सल्लामसलत करण्याची गरज होती. जर दोन्ही घटकांच्या संमतीने कायदा झाला असता तर तो अधिक चोखंदळ व शार्प झाला असता. अर्थातच त्याचे सर्व स्तरांतून स्वागतच झाले असते.

(लेखक मुस्लिम समाजातील समस्यांचे अभ्यासक आहेत)

लेखकाचा संपर्क - ८७६६९३६३५७
kalimazim2@gmail.com